POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२९५ ● मुंबई, मंगळवार, २७ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# राज्यात पुढील ३ दिवस मुसळधार पाऊस

## राज्य सरकारच्या आपत्ती विभागाकडून सतर्कतेचा इशारा, कुठे काय परिस्थिती?

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू आहे. तसेच पुढील तीन दिवसांत ही राज्यात मुसळधार पाऊस पडणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या आपत्ती विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुणे जिल्ह्यात काही ठिकाणी ५०-६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार असून विजांच्या कडकडाटासह जोर-दार पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील पावसाच्या संकटामुळे २७,२८ व २९ मे रोजी होणारा राज्यसेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

**मुंबईत डबेवाल्यांची सेवा विस्कळीत**

राज्यात हवामान विभागाने सहा जिल्ह्यांना रेड अलर्टचा इशारा दिला आहे. सोमवारी होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मुंबईत सुरु असलेल्या मुसळधार पावसाचा डबेवाल्यांच्या सेवेवर परिणाम झाला आहे. मुंबईच्या बहुतांश भागात पाणी साचल्यामुळे रेल्वे सेवेवरही परिणाम झाला आहे.

**पश्चिम महाराष्ट्रात अतिमुसळधार**

▸ **पुणे जिल्हा :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातही दमदार पावसाने हजेरी लावली आहे. मुसळधार पावसामुळे बोअरवेलमधून पाणी येऊ लागले आहे. काही शेतकऱ्यांच्या बोरवेलमधून बाहेर पाणी येत आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात दिसणाऱ्या पावसाच्या पाण्याची परिस्थिती मे महिन्यातच दिसू लागली.

▸ **सांगली :** जिल्ह्यामध्ये गेल्या आठ दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे कृष्णा आणि वारणा नदीच्या पाणी पातळीमध्ये वाढ झालेली आहे. सांगली शहरातील आयर्विन पूलाची पाण्याची पातळी आता १६ फुटांवर पोहचलेली आहे. सकाळपासून या पाण्याच्या पातळीमध्ये एक फुटाने वाढ होत आहे. यामुळे कृष्णा व वारणा नदी दुथडी भरून वाहू लागलेली आहे.

▸ **सातारा :** फलटण येथे रविवारी १६१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. फलटण येथील बाणगंगा नदी पातळीत अचानक वाढ झाली. यामुळे शुक्रवार पेठ शनिनगर परिसरात शंभरहून अधिक घरांमध्ये पाणी शिरले. यामुळे या भागात संसार उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. नदीचे पाणी वस्तीमध्ये घुसल्यामुळे नागरिकांचे संसार उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे या भागात घरामध्ये चिखल झालेला आहे. नगरपालिका प्रशासनाकडून अग्निशामक दलाच्या गाडीतून पाण्याने परिसराची स्वच्छता करण्याचे काम सुरू आहे.

▸ **भीमाशंकर :** परिसरात पावसाने कहर केला आहे. घरात पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूसह धान्य भिजले आहे. पावसामुळे शेतीचे आणि पशुधनाचे ही मोठे नुकसान झाले आहे. भिमाशंकर आणि भोरगिरी परिसरात रात्रीपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण परिसरात हाहाकार माजला आहे. डोंगरकड्यांवरून येणारे ओढे आणि नाले दुथडी भरून वाहत असल्यामुळे नदी-नाल्यांना पूरस्थिती निर्माण झाली आहे. भात खाचरांमध्ये पाणी साचल्याने भातासाठी तयार केलेली भात खाचर पूर्णपणे नष्ट झाले आहे.

## आभाळ फाटलं! पावसाने १०७ वर्षांचा रेकॉर्ड मोडला...

## महाराष्ट्रात पूरस्थिती, मुंबईत भयानक स्थिती

संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने कहर केला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये आभार फाटल्यासारखी स्थिती आहे. पुणे आणि साताऱ्या जिल्ह्यात पूर स्थिती निर्माण झाली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. खबरदारी म्हणून ठ्ठप्रक्क्षचे पथक देखील दाखल झाले आहे. मुंबईत तर पावसामुळे भयानक स्थिती निर्माण झाली आहे. यंदा पावसाने 107 वर्षांचा रेकॉर्ड मोडला आहे.


मागील चार दिवसापासून सातारा जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू आहे. पावसामुळे सातारा जिल्ह्यातील नद्यांच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ झाली. अनेक नद्या दुथडी भरून वाहत आहेत. साताऱ्यातील संगम माहुली येथील नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात सध्या वाढ झालेली आहे.

पुणे जिल्ह्यात पावसानं थैमान घातले आहे. पुण्यात मे महिन्यातील रेकॉर्डब्रेक पावसाची नोंद झाली आहे. इंदापूर, बारामती, दौंडला पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. नदी-नाल्यांना पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. बारामती आणि दौंड परिसरात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. रविवारी झालेल्या जोरदार पावसामुळे बारामतीतील नीरा कालवा फुटला असून अनेक घरांमध्ये पाणी शिरल आहे. प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ठ्ठप्रक्क्षच्या दोन टीम परिसरात तळ ठोकून आहेत.

मुंबईत झालेल्या पावसाने १०७ वर्षाचा रेकॉर्ड मोडला आहे. मे महिन्यात मुंबईत १०७ वर्षांतील सर्वात जास्त पाऊस पडला आहे. ज्याने मागील सर्व विक्रम मोडले आहेत. मुंबईत मान्सूनने नवा विक्रम केलाय. १६ दिवस आधीच मान्सून मुंबईत दाखल झालाय. ११ जूनला दाखल होणारा मान्सून यंदा २६ मेरोजी दाखल झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. यापूर्वी २९ मे रोजी मान्सून मुंबईत दाखल झाला होता. १९५६, १९६२ आणि १९७१ मध्ये २९ मे रोजी मुंबईत पावसाचे आगमन झाले होते.

**मुंबईत झालेल्या पावसाची नोंद**

- कुलाबा - १०५.२ मिमी
- सांताक्रूझ - ५५.० मिमी
- वांद्रे - ६८.५ मि.मी
- जुहू विमानतळ - ६३.५ मिमी
- टाटा पॉवर चेंबूर - ३८.५ मि.मी
- विक्रोळी - ३७.५ मि.मी
- महालक्ष्मी - ३३.४ मिमी
- सायन - ५३.५ मिमी



# मुंबईची झाली तुंबई

मुंबई आणि उपनगरसह राज्यातील बहुतांश भागात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. अशातच महाराष्ट्रात मान्सून दाखल झाल्यानंतर सोमवारी पहाटेपासून मुंबईत जोरदार पाऊस सुरु आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार आज मुंबईतील अनेक भाग जलमय झाले आहे. या दमदार पावसाचा फटका लोकल ट्रेन्स आणि वाहतूक व्यवस्थेवर ही दिसून आले आहे. तर या पावसाच्या पाण्याचा फटका आता चक्क केईएम रुग्णालयाला ही बसल्याचे बघायला मिळाले आहे. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे केईएम रुग्णालयातील तळमजल्यात पाणी साचले आहे. पावसाचे पाणी अगदी तळमजल्यापर्यंत शिरले असून रुग्णालयातील बालरोग अतिदक्षता विभाग (पीआयसीयू) पर्यंत पाण्याचा शिरकाव झाला आहे. ज्यामुळे रुग्ण आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मोठी गैरसोय झाली असून रुग्णालय प्रशासनात चिंता निर्माण झाली आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, केईएम रुगाणालयातील रेडिओलॉजी डिपार्टमेंटसमोर सध्या मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. कर्मचाऱ्यांच्या वतीने पाणी काढण्याच काम सुरू आहे. मात्र हा रुग्णालयात रुग्णांचा येण्याजाण्याचा रस्ता असल्यामुळे या भागात मोठी गर्दी देखील झाली आहे.

**पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली**

मुंबईच्या पश्चिम उपनगरात मागील अर्धा तासापासून सुरू असलेला जोरदार पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवेमध्ये सध्या दोन ते अडीच फूट पाणी भरल्यामुळे अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. अंधेरी पोलिसांनी सबवे बाहेर बॅरिकेट लावून सबवे बंद केला आहे. सध्या अंधेरी सबवे परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहन चालकांना अंधेरी गोखले पुलाचा वापर करण्यासाठी पोलीस सूचना देत आहे. सध्या सबवेमध्ये भरलेला पाणी पालिकेचे कर्मचारी जनरेटरच्या माध्यमातून बाहेर काढण्याचे युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहेत.

# दुसऱ्यांदा मुलगी झाली म्हणून छळ...

## महिला आरोग्य अधिकाऱ्याची आत्महत्या

**■अमरावती । प्रतिनिधी :**

अमरावती शहरात एक हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. दुसऱ्यांदा मुलीचा जन्म झाल्यामुळे सासरच्या लोकांकडून मानसिक छळ सहन करणाऱ्या ३२ वर्षीय महिला आरोग्य अधिकाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. मृत महिलेचे नाव शुभांगी निलेश तायवडे असून ती सीएचओ (समुदाय आरोग्य अधिकारी) म्हणून कार्यरत होती. ही दुर्दैवी घटना अमरावतीच्या तपोवन संकुलातील जयभोले कॉलनीत रविवारी (२५ मे) सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. शुभांगी मूळची नागपूरची असून तिचा विवाह नोव्हेंबर २०११ मध्ये नीलेश तायवडे (वय ३५) या बँक मॅनेजरशी झाला होता. शुभांगीला दोन मुली आहेत. त्यापैकी धाकटी मुलगी फक्त १३ महिन्यांची आहे. शुभांगीच्या कुटुंबीयांनी केलेल्या आरोपानुसार, दुसऱ्यांदा मुलगी झाल्यापासून शुभांगीवर तिचा पती नीलेश, सासू, दीर, नणंद आणि पतीचा एक मित्र सतत टोमणे मारत होते. घरात तिचा मानसिक छळ होत होता. या त्रासाला कंटाळून शुभांगीने राहत्या घरी मुलींच्या पाळण्याच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच शुभांगीचे वडील राजेंद्र तुरकाणे (वय ६५, रा. नागपूर) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पती नीलेश तायवडे, ७० वर्षीय सासू, नीलेशचा भाऊ नितीन तायवडे (वय ३८), वहिनी हातुर्ना (वय ४५) आणि नितीनचा मित्र नयन रामटेके यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आत्महत्येच्या एक दिवस आधी, २४ मे रोजी संध्याकाळी ७ वाजता शुभांगीने तिच्या वडिलांशी फोनवर संवाद साधला होता. त्या संवादात तिने तिला सासरी होणाऱ्या मानसिक त्रासाबद्दल सांगितले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्या मृत्यूची बातमी मिळाली. शुभांगीचे कुटुंबीय पोहोचेपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. तिच्या वडिलांनी जावयाने लेकीचा खून केला असल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाचा तपास गाडगेनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. शुभांगीच्या आत्महत्येमुळे संपूर्ण परिसरात शोक- कळा पसरली असून, समाजातील स्त्रीभ्रूणभेद आणि मुलींच्या जन्माविषयी असणारी नकारात्मक मानसिकता पुन्हा एकदा समोर आली आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि दोन निष्पाप मुलींचे भविष्य सुरक्षित राहावे, अशी मागणी सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.



# संत ज्ञानेश्वर नाईट हायस्कूल कुर्ला (प), मुंबई या शाळेचा निकाल ८७.५% टक्के!!!

**■मुंबई । प्रतिनिधी :**

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ भिवंडी संचालित - संत ज्ञानेश्वर नाईट हायस्कूल, बैल बाजार, कुर्ला पश्चिम, मुंबई -४०००७० या रात्र शाळेचा फेब्रुवारी-२०२५ एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ८७.५% लागला असून विद्यार्थी पालक व शिक्षक वर्गांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येते.

या रात्र शाळेची स्थापना १९७१ ची असून शासन अनुदानित मान्यता आहे. रात्र शाळेच्या स्थापनेपासून आजपर्यंत रात्र शाळेचे शैक्षणिक कार्य यशस्वीपणे राबवले जात आहे. आज रात्र शाळा परिसरामध्ये नावारूपाला येत आहे. मराठी माध्यमाची रात्र शाळा ही ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण आहे किंवा नोकरी मध्ये प्रमोशन





घेण्यासाठी अधिक शिक्षणाची आवश्यकता लागत आहे असे विद्यार्थी व नियमित विद्यार्थी रात्र शाळेत येऊन आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. रात्र शाळेत वयाची अट नसल्याकारणाने १४ वयोगटाच्या पुढील कितीही वयापर्यंतचा विद्यार्थी रात्र शाळेत प्रवेशित होऊ शकतो व त्याचे शिक्षणाचे राहिलेले स्वप्न तो पूर्ण करू शकतो.

रात्र शाळेचे मुख्याध्यापक श्री विश्वनाथ राऊत व सहकारी शिक्षक श्री समाधान खैरनार सर तसेच मासूम संस्थेकडून इंग्रजी विषय शिकविण्यासाठी देण्यात आलेले श्री शहाजी ओव्हाळ सर गणित विज्ञान विषयासाठी श्री योगेश विरकर सर यांनी एसएससी परीक्षेचा निकाल शंभर टक्के कसा लावता येईल त्यासाठी खूप प्रयत्न केले. मागील पाच वर्ष रात्र शाळेचा निकाल शंभर टक्के देण्यात आलेला आहे. परंतु या शैक्षणिक वर्षात एसएससी परीक्षेचा निकाल ८७.५% देण्यात आला आहे.

एसएससी परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त झालेला विद्यार्थी प्रवीण सुधाकर साळवे -६१.८% द्वितीय क्रमांक स्वप्निल संतोष साळवे- ६० %, तृतीय क्रमांक साक्षी दीपक मानकर -५३.४% गुण प्राप्त करून यश संपादित केले आहे. पास झालेले सर्व विद्यार्थी आपले पुढील शिक्षण चालू ठेवणार आहे.

रात्र शाळेला सपोर्ट करणारी मासूम संस्था रात्र शाळेच्या प्रत्येक विद्यार्थ्यार्ला त्याचे करिअर घडवण्यासाठी मदत करत असते. त्याबद्दल मासूम संस्थेच्या संस्थापिका माननीय निकिता केतकर मॅडम व त्यांचे कार्य सांभाळणारी संपूर्ण टीम यांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री विश्वनाथ राऊत व संस्थेने मानले आहेत. पास झालेल्या प्रत्येक विद्यार्थी यापुढे चांगलं कौशल्यपूर्ण शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा विचार करत आहे. आपले शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच आठवी, नववी व दहावीच्या वर्गात प्रवेश घेण्याचे आव्हान मुख्याध्यापक करत आहेत.

# पुण्यात वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती

पुणे पुन्हा एकदा हादरलं आहे, पुण्यात वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती घडली आहे. सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेनं विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवानं या घटनेत तिचा जीव वाचला आहे. त्यानंतर विवाहितने दाखल केलेल्या तक्रारीवरून पती, सासू आणि दीर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील पीडितेनं दिलेल्या फिर्यादीनुसार तीचं अजय पवार यांच्याशी २२ मे २०२२ रोजी लग्न झालं, लग्नाच्या अवघ्या ६ महिन्यातच अजय पवारने घरगुती कारणावरून आपल्या पत्नीला शिवीगाळ आणि मारहाण केली, यानंतर सासूने देखील पीडितेला ह्लतु माहेरावरुन काय आणले आहेस? तुज्या आई बापाला काही मिळत नाही, तुमची काही लायकी नाहीह्व असं म्हटलं. त्यानंतर पती अजय पवार हा देखील पीडितेला ह्लमी तुज्याशी टाईमपास केला, आता तू मेली तरी चालेल. मला पैशाची गरज आहे, मला चारचाकी गाडी घेवून देण्यास सांग तुज्या बापाला,ह्व असं म्हटंला. पीडितेनं गाडी घेऊन देण्यास नकार दिला. दरम्यान गाडीला नकार दिल्यानंतर पतीने आपला गळा दाबून मारहाण केली, तसेच दीर मनोज पवार याने देखील आपल्याला शिवीगाळ केली असा आरोप या घटनेतील पीडितेनं केला आहे. २१ मे रोजी पीडितेच्या सासूने पुन्हा एकदा तिला त्रास दिला, ''पहिल्या सुनेलाही घराबाहेर काढले तसेच तुलाही बाहेर काढीन,'' अशी धमकी सासूने तिला दिली. ''तू पांढऱ्या पायाची आहेस, तुझी नजर चांगली नाही तू घरात आल्यापासून शांतता नाही,'' असं हिणवलं. हा त्रास सहन न झाल्याने या तरुणीने रागाच्या भरात झुरळ मारण्याचं औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवानं या घटनेत या पीडितेचा जीव वाचला आहे, त्यानंतर तिने दिलेल्या तक्रारीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात पीडितेचा पती अजय पवार, सासू कमल पवार आणि दीर मनोज पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती या प्रकरणात पोलिसांकडून देण्यात आली आहे. दरम्यान १६ मे रोजी सासरच्या छळाला कंटाळून वैष्णवी हगवणे या तरुणीने गाळफास घेऊन आत्महत्या केली, या प्रकरणात तिचा पती, सासरा, सासू आणि दीर यांना पोलिसांनी अटक केली आहे. हे प्रकरण ताजं असतानाच आता पुण्यात आणखी एक अशीच घटना समोर आली आहे.

# अल्पवयीन तरुणीचे अपहरण करुन ६० दिवस लैंगिक अत्याचार

**■डोंबिवली । प्रतिनिधी :**

डोंबिवलीत महाराष्ट्राला हादरवणारी घटना घडली आहे. अल्पवयीन तरुणीचे अपहरण करुन ६० दिवस लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. या तरुणीचा गर्भपात देखील करण्यात आला. या प्रकरण चौघांना अटक करण्यात आली आहे. मात्र, तरुणीचे अपहरण करणारा आरोपी फरार आहे. या घटेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेमुळे डोंबिवलीत संतापाची लाट उसळली आहे. मसाला विक्री करणाऱ्या एका इसमाने एका सोळा वर्षीय अल्पवयीन तरुणीचे अपहरण करून तिच्यावर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केला. पीडित तरुणी गर्भवती राहिल्या नंतर एका महिलेच्या घरी नेऊन तिचा गर्भपात केला. त्यानंतर आरोपीने पीडित तरुणीला एका दाम्पत्याच्या घरी ठेवले. या दाम्पत्याने तिला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. तिच्यावर पुन्हा लैंगिक अत्याचार सुरू होता.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने हा सगळा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अखेर या टिळक नगर पोलिसांनी महिलेच्या घरी छापा टाकत मुलीची सुटका केली. पोलिसांनी एक महिलेसह तिचा पती ,दोन पुरुष अशा चार जणांना बेड्या ठोकल्यात. धक्कादायक म्हणजे यामधील अटक झालेली मुस्कान शेख या महिलेविरोधात याआधी देखील पीटा अंतर्गत गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे

पीडित तरुणी आपल्या आई आणि बहिणींसह डोंबिवली जवळील ग्रामीण परिसरात राहते. तिच्या आईचा खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय आहे. याच व्यवसायातून आशुतोष राजपूत या तरुणाचे त्यांच्या घरी येणे जाणे होते .तो देखील मसाले विक्रीचा व्यवसाय करत होता. याच ओळखीचा फायदा घेत आशुतोषने पीडित अल्पवयीन तरुणीशी ओळख वाढवली.

अल्पवयीन तरुणीने दहावीची परीक्षा दिल्यानंतर तिचे आणि तिच्या आईचे भांडण झाले. या दरम्यान तिचा आशुतोषशी संपर्क झाला. त्याने या तरुणीला त्याच्या घरी गेली. या संधीचा आशुतोषने फायदा घेतला. तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलगी घरी परतली नाही म्हणून आईने शोधा शोध करण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान आशुतोष हा तिच्या आईला भेटत होता. तुमच्या मुलीला आज या ठिकाणी बघितले त्या ठिकाणी बघितले असे सांगून मुलगी शहरातच आहे असे सांगत होता. मुलगी रागवलेली असल्याने ते परत येईल या आशेने पीडितेची आई आशुतोष वर विश्वास ठेवत होती.

मात्र दोन महिन्यांपासून मुलगी घरीच न आल्याने तिला संशय आला. तिने याप्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात मुलीचे अपहरण झाल्याची नोंदवली. पोलिसांनी मुलीचा शोध सुरू केला. याचदरम्यान ही मुलगी डोंबिवली जवळील ग्रामीण भागात एका घरात असल्याची माहिती मिळाली पोलिसांनी. या ठिकाणी छापा टाकत या पीडित मुलीची सुटका केली. पीडित मुलीने केलेल्या खुलाशानंतर पोलिसांनी तपासाची चक्री फिरवली. मुस्कान शेख तिचा नवरा यांच्यासह दोन जणांना अटक केली.

चौकशी दरम्यान धक्कादायक माहिती समोर आली. आशुतोष राजपूत याने मुलीचं अपहरण करत तिला एका खोलीत डांबून ठेवले होते. तीच्यावर लैंगिक अत्याचार केला. पिडीता गर्भवती राहिली. तिला एका दुसऱ्या महिलेच्या घरी नेऊन गर्भपात केला. त्यानंतर पुन्हा काही जणांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतर त्या ठिकाणाहून या मुलीला मुस्कान शेख नावाच्या एका महिलेच्या घरी डांबून ठेवण्यात आले होते. तिथे या पीडितेला वेश्या व्यवसायात ढकलत तिच्यावर लैंगिक अत्याचार सुरूच असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी पुढील तपास सुरू केलाय तर या प्रकरणात आशुतोष राजपूत हा अद्याप फरार आहे पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



# डॉक्टर पत्नीचा आयटी इंजिनियर पतीकडून छळ, मर्सिडीज कार घेण्यासाठी माहेरच्यांकडून २५ लाखांची मागणी

**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्यात सध्या हुंडाबळी आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असल्याचे समोर आले असताना नाशिकमध्ये पुन्हा एकदा एक महिला अत्याचाराचा प्रकार समोर आला आहे. मर्सिडीज कारची मागणी करत माहेरून २५ लाख रुपये आणण्यासाठी स्नेहल घुले या डॉक्टर पत्नीचा आयटी इंजिनिअर पतीकडून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी महिलेचा पती, सासू- सासरे आणि दीर- ननंद यांच्याविरोधात नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत असून तपासाअंती या घटनेचे सत्य समोर येणार आहे.

## पुणे पाठोपाठ नाशकात दोन महिला अत्याचाराच्या घटना, शहरात खळबळ

एकीकडे राज्यात पुणे येथील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण गाजत असताना या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. असे असताना नाशिकमध्ये अशाच दोन घटना समोर आल्याचे समोर आले आहे. शहरातील उच्चभ्रू वस्ती असलेल्या गंगापूर येथे ३७ वर्षीय विवाहित महिला भक्ती अथर्व गुजराथी हिने आत्महत्या केल्याची घटना उडाली होती. सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची तक्रार मृत महिलेच्या नातेवाईकांनी केली होती. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात सासरच्या लोकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तर या प्रकरणी कालच भाजप आमदार चित्रा वाघ यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेतली आहे. आता भक्ती गुजराथीचा पती आणि सासऱ्याला गुजरातमधून नाशिक पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

दरम्यान, ही घटना ताजी असताना पुन्हा अशीच एक घटना सरकारवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत घडली आहे. यात वैवाहिकेला माहेरवरुन मर्सिडीज कारसाठी २५ लाख रुपये आणण्यासाठी सासरकडून तगादा लावण्यात आला आहे. स्नेहल घुले या पेशाने डॉक्टर असून पती आयटी इंजिनिअर असून त्यांनी स्नेहलचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत असून आतापर्यंत या प्रकरणी महिलेचा पती, सासू- सासरे आणि दीर- ननंद यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# अवेळीमुळे नियोजन कोलमडले

महाराष्ट्रात १२ दिवस आधीच मान्सून दाखल झाला आहे, मात्र वेळेआधीच पाऊस आल्याने मुंबई परिसरातल्या नालेसफाईचा बोजवारा उडाला आहे. आपल्याकडे नालेसफाई वर्षानुवर्षे एकदाच पावसाळ्याआधी करण्याची पद्धत रूढ आहे.त्यातही पलिकांचे राजकारण, सरकारी मंजुऱ्या, निविदा त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हायला पावसाळ्याआधीचा एखादा महिनाच मिळतो, त्यामुळे ऐन पावसाळ्यातही नालेसफाईची कामे सुरूच असतात. यंदा दहाबारा दिवस आधीच मान्सून आल्यामुळे पाऊस वेळेआधी आलेला पाहुणा ठरला आहे. त्यामुळे या पाहुण्याची सरबराई करण्यासाठी पुरेशी तयारी यजमानांची झालेली नाही. ठाणे परिसरातल्या नालेसफाईच्या कामांना आता कुठे सुरुवात होतच होती, जोरदार पावसामुळे नाल्याच्या काठावर काढलेला थोडाथोडका गाळ पुन्हा नाल्यातच वाहून जाण्याची भीती आहे. हा गाळ वेळीच उचलला जात नसल्याने तो पुन्हा नाल्यात वाहून जातो, ही तक्रार दरवर्षीची असते. पावसाळ्यापूर्वी तयारीच्या नियोजनात पालिकांना सूर सापडला नसताना पावसाने त्रेधातिरपीट उडाली आहे. मुंबई महापालिकेवर दरवर्षीप्रमाणे नालेसफाईच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत असतो, अतिवृष्टी, पूरसदृश्य आपत्कालीन स्थिती, रस्त्यांचे खड्डे, झाडांची पावसाळपूर्व छाटणी, पावसाळी आजारांची शक्यता यावर पुरेशी उपाययोजना न झाल्यामुळे पालिका गोंधळलेल्या स्थितीत आहेत. मे महिनाअखेरीस पावसाळ्याच्या नियोजनाची कामे पूर्ण करण्याचे निर्देश पालिका प्रशासनाने दिले आहेत, मात्र ही कामे पूर्ण करण्यासाठी यांत्रिकी आणि मनुष्यबळाच्या नियोजनात कमतरता आहे. नालेसफाईची कामे अर्धवट राहिल्याने मुंबईला अतिवृष्टीचा धोका आहे. त्यावरून विरोधक आणि पालिकेतील सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या सरी कोसळण्यास सुरुवात झाली आहे. यातून अर्धवट कामे करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाईची मागणी होत आहे. तर मागील वर्षी झालेल्या नालेसफाईच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे यंदाच्या पावसाळ्याच्या तोंडावर उघड होत आहे. मागील वर्षी मुंबईतील नालेसफाईचे काम वरवरच करण्यात आले, मात्र कामाची बिले काढून ठेकेदारांचे उखळ पांढरे करण्यात आल्याचा आरोप यंदाही नेहमीप्रमाणे झाला आहे. त्यामुळे या वर्षीची पावसाळ्याची सुरुवात पाहता मुंबई तुंबण्याचा धोका विरोधकांनी वर्तवला आहे. मागील वर्षातल्या कामाची अशी स्थिती असताना या वर्षीच्या नालेसफाईचे काम अद्यापही नियोजनात चाचपडत आहे. पावसाळ्याआधी अशी स्थिती असताना महाराष्ट्रातही वेळेआधीच दाखल झालेल्या मान्सूनमुळे खरीपातील शेतकरी जरी आनंदला असला तरी तरी भाजीपाला आणि बागायतीचे या वेळेआधीच आलेल्या मान्सूनने नुकसान केले आहे. दरवर्षी मान्सूनची मराठवाड्यात उशिराने कृपा होते, यंदा मात्र कोकणासह मराठवाड्यातही पावसाच्या जोरदार सरी सुरुवातीलाच बरसत आहेत. पावसाने आपला दरवर्षीचा शिरस्ता मोडल्याने शेतकरी पेरण्यांबाबत गोंधळलेले आहेत. कृषी आणि संबंधित सर्वच विभागांना वेळेआधीच पावसाने कामाला लावले आहे. गोव्याच्या वेशीवर आलेला मान्सून कोकणात काही तासांतच दाखल होईल. त्यामुळे मत्स्य व्यवसायावरही परिणाम झाल्याने समुद्रकिनाऱ्यांवर शुकशुकाट आहे. गेटवे-मांडवा फेरी बोट पुढील तीन महिन्यांसाठी बंद करण्यात आली आहे. तर सातार्यातही अतीवृष्टीचा इशारा आहे. हवामान विभागाकडून समुद्रकिनाऱ्यांना चक्रीवादळाचा इशारा मिळाल्याने भीती वाढली आहे. त्यामुळे कोकण किनारपट्टी पर्यटकांअभावी ओस पडली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अरबी समुद्रात आणि कर्नाटक किनाऱ्याजवळ कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने १९ ते ३१ मे दरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू आहे. तर कोकण किनारपट्टीसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि अहमदनगर येथे मुसळधार पाऊस आणि काही ठिकाणी गारपीट झाल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट आहे. पुणे परिसरातील रस्त्यांना नदीचे स्वरूप आले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नागपूर, भंडारा, आणि चंद्रपूर येथे वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पुराचा धोका आहे. मुंबईत जोरदार पाऊस झाल्यास नालेसफाईची कामे पूर्ण न झाल्याने चिंता वाढली आहे. पावसामुळे महाराष्ट्रात नाशिक, सटाणा परिसरात कांदा आणि इतर पिकांना मोठा फटका बसला आहे. नांदेड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत हळद आणि इतर शेतीमाल पावसात भिजल्याने नुकसान झाले आहे. मेच्या अखेरीसच दरड कोसळणे, पूरसदृश्य स्थिती, रेड अलर्टची स्थिती निर्माण झाल्याने कृषी, आरोग्य, आपत्कालीन यंत्रणांची तारांबळ उडाली आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया मे महिन्यातच सुरू झाली आहे. हवामान विभागाने कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज आणि रेड अलर्ट जारी केले आहेत. नागरिकांना सावध राहण्याचा आणि वादळी वाऱ्यांपासून सुरक्षित राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील जिल्हे असोत किंवा शहरे, सुरुवातीच्याच पावसाने पावसाळी नियोजनाचा बोजवारा उडालेला आहे. अद्याप पावसाळा खऱ्या अर्थाने सुरू झालेला नसतानाच महाराष्ट्र आणि राज्यातील महत्वाच्या शहरांची अशी बिकट स्थिती झाली आहे. पाऊस वेळेच्या आधी आल्यामुळे काही ठिकाणी पाण्याची सोय झाली, तरी पावसाने झालेल्या नुकसानामुळे बळीराजाच्या डोळ्यातून पाणी वाहत आहे.

# पोलीस पळ काढायला लागले तर कसे होणार!

वैष्णवी-मयुरीचे सासरे राजेंद्र हगवणे यांना अटक केल्यानंतर पुणे पोलिसांनी स्वतःहून पत्रकार परिषद घेतली. त्यात केवळ १ मिनिट ८ सेकंदाची माहिती देऊन पोलीस निघून गेले. विषय एवढा संवेदनशील असताना आणि पोलिसांवर आरोप होत असताना फक्त अटक झाली, एवढे सांगायला पोलिसांनी पत्रकार परिषद घेण्याची गरज नव्हती. आणि घेतली तर माध्यमांना सामोरे जायला हवे होते. मात्र, पोलिसांनी पत्रकार परिषदेतूनही पळ काढल्याने काही लपवले जात आहे का, पोलीस उत्तर द्यायला सामोरे का जात नाहीत, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



वैष्णवी हगवणे या २३ वर्षीय विवाहितेने १६ मे रोजी गळफास घेऊन आयुष्य संपवले. हुंड्यासाठी होणारा शारीरिक आणि मानसिक छळाला ती प्रचंड वैतागली होती. ५१ तोळे सोने, अलिशान गाडी तसेच इतर ऐवज घेऊनही हगवणे कुटुंबीयांनी वैष्णवीचा प्रचंड छळ केला. ही मंडळी तिला मारहाण करायचे, नको नको ते बोलायचे. सासरच्या मंडळींनी तिचे अस्तित्वच नाकारले होते. याच मंडळींनी अगोदर वैष्णवीची मोठी जाऊ मयुरीलाही असाच त्रास दिला होता. शेवटी ती माहेरी परतली. यातील सर्वात चिंतेची बाब म्हणजे त्यांनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारींची गांभीयार्ने दखल घेण्यात आली नाही.

मयुरीने नोव्हेंबर २०२४ मध्ये पौड पोलिसांकडे तिला सासरच्या मंडळींकडून मारहाण होत असल्याची तक्रार केली होती. त्यावर पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांनी कारवाई केली नाही, असा गंभीर आरोप आहे. कदाचित त्याचवेळी कारवाई केली असती तर हगवणे कुटुंबाला चाप लागला असता, पुढे वैष्णवीचा जीव वाचला असता. पोलिसांकडून तक्रारीची वेळीच दखल न घेणे, अशा घटना यापूर्वीही अनेकदा अनेक प्रकरणात घडल्या आहेत. या मागे पोलिसांवरील दबावाचे कारण सांगितले जाते. पोलिसांवर राजकीय दबाव असतो, हे आता खुले रहस्य झाल्यासारखे आहे. बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरण याचे ठळक उदाहरण म्हणता येईल. यातील वाल्मिक कराडला अटक व्हायला किती दिवस लागले, वाल्मिक कुणासाठी काम करायचा, त्याची किती दहशत होती, याची नंतर अनेक प्रकरणे बाहेर आली. मात्र, त्याच्या गुंडगिरीला वेळीच आळा न घातल्याने संतोष देशमुख यांच्याप्रमाणे आणखी किती बळी गेले असतील याची कुणाला माहितीही नसेल.

जे संतोष देशमुख यांच्याबाबत झाले तसेच वैष्णवी आणि मयुरी हगवणे यांच्याबाबत झाले. आमचं कुणी काही वाकडं करू शकणार नाही, कुणीही आमच्या केसाला धक्का लावू शकणार नाही, हा माज संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांमध्ये होता. तसाच माज हगवणे कुटुंबीयांमध्येही दिसला. वैष्णवी आणि मयुरी यांची सासू, सासरे आणि नणंद यांच्यात तो माज दिसत होता. त्यांचे एक नातेवाईक आयजी असल्यामुळे 'आयजीच्या जीवावर हे बायजी उदार' होते. आता या आयजींनी आपला या प्रकरणाशी दुरान्वयानेही संबंध नसल्याचे जाहीर केले असले तरी त्यांच्या काही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्या आहेत. त्यातून लपवाछपवी सुरू असल्याचे दिसते. तरीही अजून फॉरेन्सिक अहवाल आला नसल्याने ती ऑडिओ क्लिप नक्की आरोपींचे नातेवाईक असलेल्या आयजीसाहेबांची आहे का, यावर शिक्कामोर्तब झालेले नाही. मयुरीने काही वृत्तवाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत पोलिसांनी गांभीर्याने या प्रकरणाकडे न पाहिल्याचा आरोप अनेकदा केला आहे. त्यानंतर पोलिसांची पळापळ सुरू झालेली दिसत आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणात वैष्णवी-मयुरीचे सासरे राजेंद्र हगवणे यांना अटक केल्यानंतर पुणे पोलिसांनी स्वतःहून पत्रकार परिषद घेतली. त्यात केवळ १ मिनिट ८ सेकंदाची माहिती देऊन पोलीस निघून गेले. विषय एवढा संवेदनशील असताना आणि पोलिसांवर आरोप होत असताना फक्त अटक झाली, एवढे सांगायला पोलिसांनी पत्रकार परिषद घेण्याची गरज नव्हती. आणि घेतली तर माध्यमांना सामोरे जायला हवे होते. मात्र, पोलिसांनी पत्रकार परिषदेतूनही पळ काढल्याने काही लपवले जात आहे का, पोलीस उत्तर द्यायला सामोरे का जात नाहीत, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

याच प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे वैष्णवीचे बाळ मिळावे म्हणून तिचे आईवडील वारजे पोलीस ठाण्यात गेले होते. तेव्हा आमची हद्द नसल्याचे सांगत पोलीस निरीक्षक विश्वजीत कायंगडे यांनी कस्पटे कुटुंबाला बाहेरचा रस्ता दाखवला. तर बावधन पोलीस ठाण्याचे विजय विभुते यांनीही वैष्णवीच्या आईवडिलांची तक्रार घेतली नाही. एवढेच नाही तर या प्रकरणाचा माध्यमांनी प्रचंड गाजावाजा केल्यानंतर कुणा अज्ञात व्यक्तीने वैष्णवीच्या काकांकडे बाळ सुपूर्द केले. यावरून हा प्रकरणात पोलिसांकडून किती निष्काळजीपणा दाखवला गेला, याची चर्चा सुरू आहे. मात्र, हे सर्व वरून आलेल्या दबावामुळे झाल्याचेही बोलले जाते. आता हा वरचा दबाव कुणाचा, याचा प्रत्येकाने अर्थ काढणेच योग्य होईल.

आता यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे हे प्रकरण खूप तापल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाचे विधान केले. ते म्हणाले आम्ही पोलीस आयुक्तांशी बोललो आहोत. गुन्हेगारांना कडक शिक्षा करण्यास सांगितले आहे. फरार राजेंद्र हगवणे याचा शोध घेण्यासाठी पथके वाढवण्यासही सांगितले आहे. मुळात पोलिसांनी त्यांची कामे करण्याबाबत मुख्यमंत्री-गृहमंत्री, उपमुख्यमंत्री यांना सूचना का द्यावी लागते? पोलीस पथके वाढवा, हे उपमुख्यमंत्र्यांना का सांगावे लागत आहे? म्हणजेच एकतर पोलिसांना त्यांची जबाबदारी कळत नाही, असा अर्थ होतो किंवा पोलीस फक्त वरून आलेल्या सूचना आणि आदेशांचे पालन करतात, असाही होतो. किंवा पोलिसांवर अप्रत्यक्ष दबाव आहे, असाही यातून अर्थ निघतो.

गुन्हा दाखल करून घेणे, तपास करणे हे पोलिसांचे कामच आहे. त्यासाठी त्यांना वरून आदेश देण्याची गरज नाही. बरे एवढे होऊनही ज्या पोलिसांनी तक्रार घेतली नाही, निष्काळजीपणा केला त्यांच्यावर कारवाई होणार का, याबाबत मुख्यमंत्री-गृहमंत्री काहीच बोलत नाहीत. आरोपी फरार होतात, चांगल्या चांगल्या गाड्यांमधून प्रवास करतात, हॉटेलात मटणावर ताव मारतात हे सर्व सीसीटीव्हीमध्ये कैद होते. राजेंद्र हगवणेसारखा आरोपी चार-पाच दिवस फरार कसा राहू शकतो, हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. त्यामुळे आरोपींना पाताळातूनही शोधून काढू, सरकार तुमच्या पाठीशी आहे, दोषींना कठोर शिक्षा होणार ही वाक्ये आता खूप गुळगुळीत झाली आहेत, ती ऐकवून सत्ताधारी आपले हसे करून घेत आहेत.

राज्यात अशी भयंकर घटना घडली आणि जनक्षोभ उसळा की, आम्ही हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवू आणि आरोपींना लवकरात लवकर सजा होईल असे पाहू, असे नेहमी सत्तार्धायांकडून जाहीर केले जाते, पण आजवर कुठले प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवले गेले हा एक संशोधनाचा विषय आहे. बरेच वेळा असे दिसून येते की, एखाद्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात येते आणि पुढे त्यांना आजारपणामुळे जामीन मिळतो. आज काही राजकीय नेतेही आजारपणाच्या कारणावरून तुरुंगातून बाहेर आहेत आणि निवडणुका लढवत आहेत. असा हा सगळा न्यायप्रक्रियेतील सावळागोंधळ आहे.

गेल्या वर्षी म्हणजे मे २०२४ मध्ये पुण्यात एका अलिशान गाडीने दोघांना उडवले. एका तरुण आणि तरुणीचा जीव गेला. मात्र, त्यावेळी अलिशान गाडी चालवणाऱ्या त्या अतिश्रीमंत बापाच्या पोराला वाचवण्यासाठी कसे प्रयत्न झाले, हे सर्वांनी पाहिले. ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरे यांनी आरोपीच्या रक्ताचे सॅम्पल बदलल्याचा आरोप झाला. आरोपीला निबंध लिहायला सांगून जामिनावर सुटका करण्यात आली, त्याच्या रक्तातील दारूचे अंश दिसू नये म्हणून पैशांच्या बदल्यात रक्ताचे सॅम्पल बदलले. आपल्या समाजात डॉक्टर आणि पोलीस यांच्याकडे अजूनही बऱ्याच आदराने पाहिले जाते. मात्र, त्यांच्याकडूनच गैरवर्तन होऊ लागले तर अधोगती थांबवणे कठीण होणार आहे.

यात पोलिसांची भूमिका खूप महत्त्वाची असते. कारण कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम ते करत असतात. सीमेवर आपले सैनिक शत्रू राष्ट्राशी लढत आहेत. तर देशांतर्गत पोलीस आपले रक्षण करत असतात. मात्र, पोलीसच आरोपींशी हात मिळवणी करू लागले तर समाजाचे कसे काय होणार? काही वर्षांपूर्वी अमिताभ बच्चन यांची प्रमुख भूमिका असलेला 'अग्निपथ' नावाचा चित्रपट आला होता. यात 'अलिबाबा मिल गया चालीस चोरों से' असे गाणे होते आणि ते खूप लोकप्रिय झाले होते. असेच चित्र दिसू लागल्याने चिंता वाढू लागली आहे, एवढेच!

# पुनरागमनाचा अन्वयार्थ

अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक नेते छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्याने त्यांच्यासह महायुतीतीलही अनेकांचा जीव भांड्यात पडला असेल; कारण भुजबळांसारखा बिनधास्त बोलणारा नेता मंत्रिमंडळाच्या बाहेर फार काळ राहणे हा राजकीयदृष्ट्या तोट्याचाच सौदा होता. डिसेंबर महिन्यात महायुतीच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला तेव्हा त्यात छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील या दिग्गजांची नावे नव्हती. त्यामुळे अजित पवार यांनी आता पक्षावर पूर्णपणे मांड ठोकण्यासाठीच हे केले असावे, असा कयास होता. अजित पवारांच्या पक्षातील दुसरे ओबीसी नेते धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर काही दिवसांतच बीड जिल्ह्यात संतोष देशमुख या तरुणाची निर्घृण हत्या झाल्याचे प्रकरण बाहेर आले. या हत्येत मुंडे यांच्या निकटवर्तीयांचा सहभाग असल्याचा आरोप चारही बाजूंनी होऊ लागला. त्यात भाजपचे आमदार सुरेश धस तर अगदी आघाडीवर होते. बीड शहरात मराठा समाजाचा लाखोंचा मोर्चा निघाला. या वादात मनोज जरांगेंनीही उडी घेतली. अखेर या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. खरे तर त्याचवेळी या जागेवर भुजबळ यांची वर्णी लागणार, हे स्पष्ट होते. खरेतर स्वतः छगन भुजबळ यांनी मुंडेची जागा मी घेणार नाही, असे सांगितले होते; पण अखेर त्याच जागेवर त्यांची वर्णी लागली. छगन भुजबळ यांनी राज्यातील मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या आंदोलनाला थेट विरोध केला होता. त्यामुळे निवडणुकीत भुजबळ यांना पाडा, असे आवाहन जरांगे यांनी केले होते. मात्र, भुजबळ चांगल्या मताधिक्याने जिंकले. जरांगे यांच्या कार्यशैलीविषयी अनेक जण नाराज होते. मात्र बोलण्याची हिंमत फक्त भुजबळ यांनीच दाखवली. त्यांच्या या हिमतीची दखल भाजप नेतृत्वाने घेतली होती; मात्र ज्येष्ठांना डावलून पक्षावर एकहाती अंमल आपलाच आहे, हे दाखविण्याच्या नादात अजित पवार यांनी त्यांना डावलले होते.

# पेटलेला पाकिस्तान फुटीच्या उंबरठ्यावर!



सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तानातील सिंध आणि बलुचिस्तान उठावाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. बलुचिस्तानमधील नेत्यांनी बलुचिस्तान हे वेगळे राष्ट्र म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे या दोन्ही प्रांतांना आवर घालणे हे पाकिस्तानपुढे आव्हान ठरलेले आहे. पाकिस्तानमध्ये गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते आणि त्याचे चित्र सिंध प्रांतात पहायला मिळत आहे. पाकिस्तानमध्ये गृहमंत्र्याचे घर जाळले. महामार्गावर मोठ्या प्रमाणात लुटमार सुरु आहे. सिंधू कालवा प्रकल्पावरुन आंदोलन हिंसक झाले आहे. या संघर्षात दोघांचा मृत्यू झाला असून पोलिसांसह अनेक जण जखमी झाले आहेत. संतप्त आंदोलक बिनधास्त अत्याधुनिक बंदुकांसह रस्त्यावर उतरले आहेत.

अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी बनल्याने दिसून येते. अमेरिकेने युक्रेन, अफगाणिस्तानसारख्या अनेक राष्ट्रांना लहूलुहान करून सोडले आहे. त्यांची मदत करण्याचे सोडून त्यांना धोका देण्याचे काम करीत आहे आणि हेच काम व्यापार आणि टेरिफच्या बाबतीतही करीत आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानच्या बाबतीत भारताला धोका देवून सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला सर्वतोपरी मदत करून संपूर्ण लाड पुरवित आहे.

आतंकवाद्यांना मागच्या दरवाजाने खतपाणी घालत असल्याचे दिसून येते. म्हणजेच अमेरिका बोलतो एक आणि करतो वेगळेच. त्यामुळे अमेरिकेपासून भारताला सावध राहणे गरजेचे आहे. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाममध्ये पर्यटकांवर आतंकवाद्यांनी हल्ला करून २८ निरपराधांची हत्या केली होती. त्याचा बदला भारताने मोठ्या शिताफीने घेतला व पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उद्धवस्त केले. शेकडो आतंकवाद्यांचा सफाया केला सोबतच अनेक पाकिस्तानी सैनिकही मारले गेले. आतंकवादविरोधी भारताची कठोर भूमिका पाहता पाकिस्तानने शेकडो मिसाईल भारतावर डागण्याचा प्रयत्न केला, परंतु पाकिस्तानची संपूर्ण मिसाईल भारतीय सेनेने निष्क्रिय करून त्याची औकात त्याला दाखवली.

पाकिस्तानची मिसाईल कारवाई पाहता भारतानेसुध्दा पलटवार केला. पाकिस्तानमध्ये १०० किलोमीटर आत घुसून पाकिस्तानच्या एअरबेससह अनेक ठिकाणे उद्धवस्त करून अनेक आतंकवादी ठिकाणे जमीनदोस्त केली. भारताची कठोर कारवाई पाहता पाकिस्तानने आपोआप गुडघे टेकले. युद्धबंदीची भीक डोनाल्ड ट्रम्पच्या माध्यमातून भारताकडे मागायला लागला. भारताने आपल्या शर्तीवर युद्धविराम केला आणि खडसावून सांगितले की, यानंतर आतंकवाद्यांकडून एकजरी गोळी चालली तर भारताकडून आगीचे गोळे टाकण्यात येईल.

भारताने पाकिस्तान, अमेरिकेसह जगाला स्पष्ट शब्दात ठणकावून सांगितले की जोपर्यंत आतंकवाद खत्म होत नाही तोपर्यंत ऑपरेशन सिंदूर सुरूच राहील. परंतु ज्या पाकिस्तानमध्ये आतंकवाद्यांची फॅक्टरी आहे व अमेरिकेवर हल्ला करणारा मास्टरमाईंड ओसामा बिन लादेन याने अमेरिकेला वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला केला. यात ३ हजारपेक्षा अधिक लोकांचा बळी गेला होता. नंतर अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पाकिस्तानमध्ये घुसून मारले होते. एवढे सर्व असताना आज अमेरिका पाकिस्तानचे गुण गातो. सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनसुध्दा देत आहे, ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

अमेरिका नेहमीप्रमाणे आताही दुटप्पी नीतीचा वापर करीत आहे. भारत-पाक संघर्ष सुरू असतानाच आय.एम.एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब १ अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे. आयएमएफचे पूवीर्चे कर्ज अजूनपर्यंत पाकिस्तानने फेडलेले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले. यावर भारत सरकारने नाराजीसुध्दा व्यक्त केली आहे. कारण पाकिस्तानला मिळणारे ८० टक्के कजार्चा पैसा हा आतंकवादी संघटनांना दिला जाणार आहे.

जर भारताची सैन्य शक्ती, ब्रम्होससारखे अत्याधुनिक मिसाईल पाहून अमेरिका, चीन व तुर्की गडबडल्याचे दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत भारताची जगात वाढती ताकद पहाता पाकिस्तानच्या मदतीला अमेरिका, तुर्की व चीन खुलेआम उभे असल्याचे दिसून येते. त्यामुळे आज अमेरिका विश्वासपात्र देश राहिला नसून एक गद्दार देश बनला आहे. तुर्कीतील भूकंप काळात भारत सर्वप्रथम धावून गेला व सर्वतोपरी मदतसुध्दा केली. परंतु आज तुर्कीसुध्दा पाकिस्तानच्या बाजूने आहे. त्यामुळेच भारतीयांनी तुर्कस्तानच्या पर्यटनावर बहिष्कार टाकला आहे. जेणेकरून त्याची औकात त्याला समजायला हवी.

आपला खरा मित्र व विश्वासपात्र देश म्हणजे फक्त रशिया हेही तितकेच सत्य आहे. गेल्या 78 वर्षांचा इतिहास आहे की अमेरिकेने भारतापेक्षा पाकिस्तानलाच सर्वतोपरी मदत केली आहे. त्यामुळे भारताने डोनाल्ड ट्रम्पपासून सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे. पाकिस्तान हा आतंकिस्तान आहे त्यामुळे त्याची प्रगती तर होऊच शकत नाही. उलट त्याचे अनेक तुकडे-तुकडे होण्याची दाट शक्यता आहे. ज्याप्रमाणे पाकिस्तानपासून बांगलादेश वेगळा झाला, त्याच धर्तीवर आज पाकिस्तानमधील अनेक प्रांत पाकिस्तानसोबत राहाण्यास तयार नाहीत.

सध्याच्या परिस्थितीत सिंध प्रांत व बलुचिस्तान उठावाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. हे दोन्ही प्रांत पाकिस्तानसाठी बाभळीचे काटे बनणार आहेत. हे बाभळीचे काटे पाकिस्तानला एवढ्या जखमा देऊन जातील की तो मरेपर्यंत कधीच विसरणार नाही. जैसी करणी वैसी भरणी हेही तितकेच सत्य आहे. सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तानमध्ये गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते आणि त्याचे चित्र सिंध प्रांतात पहायला मिळत आहे. पाकिस्तानमध्ये गृहमंत्र्याचे घर जाळले. महामार्गावर मोठ्या प्रमाणात लुटमार सुरू आहे.

सिंधू कालवा प्रकल्पावरून आंदोलन हिंसक झाले आहे. या संघर्षात दोघांचा मृत्यू झाला असून पोलिसांसह अनेक जण जखमी झाले आहेत. संतप्त आंदोलक बिनधास्त अत्याधुनिक बंदुकांसह रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे ही संपूर्ण परिस्थिती पाकिस्तानच्या आवाक्याबाहेर जाताना दिसत आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तान प्रांतात स्कूल बसवर करण्यात आलेल्या आत्मघातकी हल्ल्यात तीन बालकांसह पाच जणांचा मृत्यू झाला. 38 जण जखमी झाले. अशा पाकिस्तानमध्ये त्यांचेच बंधू आतंकवादी कारवाया करीत आहेत तर दुसरीकडे पाकिस्तानची जनता पाकिस्तान सरकारला त्रासल्यामुळे मोठा उठाव करण्याच्या तयारीत आहे. म्हणजेच पाकिस्तान जेवढे पाप करीत आहे त्याच्या दुप्पट त्याला यातनासुध्दा भोगाव्या लागत आहे.

अशा परिस्थितीत अमेरिकेने जर पाकिस्तानला मदत केली तर कालांतराने परिस्थिती अधिकच बिघडू शकते. कारण मिळालेल्या पैशाच्या उपयोग हा काही पाकिस्तानच्या विकासासाठी करण्यात आल्याचे आजवर दिसून आलेले नाही. पाकिस्तानचे राज्यकर्ते आणि लष्कराने तो पैसा भारताच्या विरोधात आधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी केलेला आहे. भारतात ज्योती मल्होत्रासारखे अनेक गद्दार आहेत, ते पाकिस्तानसाठी हेरगिरी करीत आहेत. अशांच्या मुसक्या सरकारने ताबडतोब आवळल्या पाहिजे. यांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.

इतिहास सांगतो आपल्या घरात कोणी ना कोणी गद्दार असतो यालाच म्हणतात घर का भेदी लंका ढाये आणि यामुळेच पहलगाम हत्याकांड झालेले आहे. त्यामुळे ज्योती मल्होत्रासारखे अनेक असू शकतात की ते पाकिस्तानसाठी हेरगिरी करीत असतील. अशांना सुरक्षा विभागाने जागीच ठेचले पाहिजे. त्याचप्रमाणे राजकीय पुढार्यांनी हे लक्षात ठेवायला हवे की, ऑपरेशन सिंदूर देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. त्यामुळे यावर कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही याची जातीने काळजी घ्यायला हवी. हेरगिरी किंवा अन्य गद्दारांना सजा देण्यासाठी सहकार्य करायला हवे, त्यात राजकारण आणू नये. कारण तसे केल्यास पाकिस्तान त्याचा गैरफायदा उठवू शकतो. आता त्याचा मित्र असलेला डोनाल्ड ट्रम्प याला पुन्हा मदत करू शकतो.

पाकिस्तानची निर्मिती ही हिंदूंच्या द्वेषातून झालेली आहे, त्यांनी त्यांच्या नेत्यांच्या मागणीनुसार वेगळा भूभाग मिळवला, पण त्याचा विकास त्यांनी केला नाही. त्यांना जी मदत बाहेरील देशांकडून आली त्याचा उपयोग भारताच्या विरोधात केला. ज्यावेळी त्यांना भारताशी थेट युद्ध करून त्यात विजय मिळवणे अशक्य आहे, असे दिसून आले तेव्हा त्यांनी भारताविरोधात छुपे युद्ध सुरू केले. त्यातून भारतात अनेक घातपाती घटना घडवण्यात आल्या. त्यासाठी भारतातील त्यांच्या हस्तकांचा वापर करून घेण्यात आला. पण हे सगळे करत असताना त्यांना त्यांच्या देशाचा विकास करता आला नाही. तिथे चीनचा मोठ्या प्रमाणात शिरकाव होत आहे, त्याचा त्रास पाकिस्तानातील स्थानिक नागरिकांना होत आहे. त्यामुळे ते बंड करून उठत आहेत. त्यामुळे आता त्यांना बांगलादेशप्रमाणे स्वातंत्र्य हवे आहे. त्यामुळेच आता पाकिस्तान फुटीच्या उंबरठ्यावर आलेला आहे. आतून आणखी जोर लागला तर पाकिस्तानचे तुकडे होतील.

# पाकिस्तानातील सिंधी उद्रेक



भारताच्या कुरापती काढण्यात धन्यता मानणाऱ्या पाकिस्तानमध्ये अंतर्गत असंतोषाची धग शमण्यास तयार नाही; उलटपक्षी बलुचिस्तानपाठोपाठ सिंध प्रांतामध्येही हिंसाचाराचा भडका उडाला आहे. अनेक अडचणींनी त्रस्त असलेल्या पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांच्या चिंतेमध्ये त्यामुळे आणखी भर पडली आहे. सिंधू कालवा प्रकल्प आणि कॉर्पोरेट शेतीच्या योजनेच्या विरोधात स्थानिकांनी नौशहरो फिरोझ जिल्ह्यात केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आणि संतप्त निदर्शकांनी सिंध प्रांताच्या गृहमंत्र्यांचे घर जाळले, पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तिघांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. सिंधमधील शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या मुळाशी आहे, तो 'ग्रीन पाकिस्तान इनिशिएटिव्ह' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प. समारे साडेतीन अब्ज डॉलरची गुंतवणूक असलेल्या या प्रकल्पास तेथील 'दुसरी हरितक्रांती' असे संबोधण्यात येत आहे. त्याअंतर्गत येथील चोलिस्तान वाळवंटी प्रदेशातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्देशाने शेकडो किलोमीटर लांबीचे सहा कालवे काढण्यात येणार आहेत; मात्र पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख फील्ड मार्शल आसिम मुनीर यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेल्या या योजनेमागे सिंधला मिळणारे पाणी पंजाबकडे वळवण्याचा डाव असल्याचा आंदोलकांचा आरोप आहे. भारताने सिंधू जलवाटप करारास स्थगिती दिल्यामुळे सिंधला मिळणारे पाणी कमी होण्याच्या चिंतेत या प्रकल्पाने भरच पडली. काही दिवसांपूर्वीच आंदोलकांनी कराची बंदराकडे जाणारा रस्ता बराच काळ रोखून धरला होता. पाकिस्तानी लष्कर आणि सत्ताधाऱ्यांमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. अंतर्गत पाणीवाटपामध्ये सिंध प्रांताच्या वाट्याला २० टक्के पाणी कमी आल्याचा आरोप आहे. त्यातच यंदा तेथे सरासरीपेक्षा ६२ टक्के पाऊस कमी झाल्याने दुष्काळी स्थिती आहे. या प्रकल्पाचा मोठा गाजावाजा होत असला, तरी प्रत्यक्षात लष्कराच्या मालकीच्या कंपनीमार्फत येथील जमिनी दीर्घ मुदतीच्या कराराने अधिग्रहित करण्यासही शेतकऱ्यांचा विरोध आहे. तेल-वायू, साखर, बांधकाम अशा अनेक क्षेत्रांत लष्कराच्या ५० कंपन्या असून त्यामार्फत लष्करी अधिकारी आणि त्यांचे बगलबच्चेच गब्बर झाले आहेत. एकूणात पाकिस्तानी सत्ताधारी आणि लष्कराच्या सर्वसमावेशक दृष्टीच्या अभावामुळे विविध प्रांतांमधील नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होऊ लागल्याने दिवाळखोरी आणि आर्थिक समस्यांनी ग्रासलेल्या पाकिस्तान सरकारच्या डोकेदुखीत भर पडत आहे.

## कोको नानकटाई

**साहित्य :** १०० ग्रॅम मैदा, २० ग्रॅम कोको पावडर, १०० ग्रॅम पिठीसाखर, ७५ ग्रॅम पांढरे लोणी किंवा वनस्पती तूप, १/२ टीस्पून व्हॅनिला इसेन्स, १/४ टीस्पून बेकिंग पावडर.

**कृती :** पिठीसाखर-लोणी/तूप एकत्र करून हलके होईपर्यंत फेटून घ्या. मैद्यात बेकिंग पावडर, कोको पावडर टाकून चाळून घ्या. फेसलेल्या लोणीत चाळलेला मैदा व व्हॅनिला इसेन्स घाला. मिश्रणाचे लहान गोळे करा. ते दाबून जरा चपटे करून बेकिंग ट्रेमध्ये १ इंचाचे अंतर ठेवून मांडा. कन्व्हेक्शनवर मायक्रोवेव्ह प्रि-हीट करून १६० डिग्रीवर ५ मिनिटे बेक करा.



## स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी मेकअपच्या 'या' टिप्स येतील कामी, जाणून घ्या अधिक



**बहुतांश** वेळेस महिलांना प्रेग्नन्सीनंतर शरीरावर स्ट्रेच मार्क येतात. त्यामुळे एखादा शॉर्ट कुर्ता किंवा टी-शर्ट घातल्यास शरीरावरील स्ट्रेच मार्क दिसून येतात. असे झाल्यास आपल्याला स्ट्रेच मार्कमुळे अवघडल्यासारखे वाटते.

यामुळे आपण काही वेळेस स्टायलिश कपडे घालण्याचा विचार करत नाही. स्ट्रेच मार्क हे त्वचेवर ताण पडल्यास निर्माण होतात. यामध्ये घाबरण्याची किंवा लाजण्याची काहीच गरज नाही. पार्टीसाठी तयार होण्यासाठी काही जण हेच स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी विविध उपाय करतात. तर जाणून घ्या स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी तुम्हाला मेकअपमधील काही सोप्या टिप्स कामी येतील.

स्ट्रेच मार्क लपवण्याची वेळ आल्यास रंगांची विसंगती काही वेळेस होते. त्यामुळे जर तुमची त्वचा तांबड्या रंगाची असेल तर त्याला हलक्या रंगाच्या मेकअपमधील पिवळ्या रंगाची शेड लावून लपवू शकता. तसेच अंगावरील स्ट्रेच मार्क खूप जुने असल्यास त्याबाबतसुद्धा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. अशावेळी तुम्ही तुमच्या स्कीन टोनप्रमाणे रंग निवडून स्ट्रेच मार्क लपवू शकता. स्ट्रेच मार्क लपवल्यानंतर त्यावरील मेकअप कायम राहावा यासाठी मेअकप ब्रशने त्यावर सेटिंग पावडर लावणे विसरू नका. तसेच मेकअप शिवाय तुम्ही सेल्फ-टॅनरच्या मदतीने सहजतेने लपवू शकता.



## केस गळती रोखेल कडीपत्ता आणि जास्वंद तेल

**केसगळती ही जागतिक समस्या आहे. बरेच उपाय करूनही केसगळती काही कमी होत नाही. पण आपण कडीपत्ता आणि जास्वंदाच्या तेलाच्या वापर केल्यास केस गळतीपासून काहीसा आराम मिळू शकतो. यासाठी आपल्याला याचे तेल बनवावे लागणार आहे. चला तर मग हे तेल कसे बनवायचे आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊ या.**



**साहित्य–** १०० ग्रॅम नारळाचे तेल, ३-४ चमचे एरंडेल तेल, ४ -५ जास्वंदाचे फुले, ३ मूठ कडीपत्ता, ३ चमचे तीळ, ३ चमचे मेथीदाणा, १ वाटी किसलेला कांदा, किसलेला आवळा आणि आले.

**कृती :** सर्वप्रथम नारळाच्या तेलात कडीपत्ता, जास्वंदाची फुले, तीळ, मेथीचे दाणे, किसलेला कांदा, किसलेला आवळा, आले घालून गॅसवर मंद आचेवर ठेवावे. गॅस मंदच असावा. नाहीतर तेल जळू शकते. सर्व रसांचा अर्क नारळाचा तेलात उतरल्यावर गॅस बंद करून थंड होण्यासाठी ठेवावे. हे आयुर्वेदिक तेल आठवड्यातून दोनदा लावल्याने केसगळतीच्या त्रासापासून आराम मिळतो आणि केसगळती थांबते. गरज असल्यास एरंडेल तेलसुद्धा टाकावे. अजून चांगले परिणाम मिळतात.

## वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम
## जाणून घ्या प्रतिबंधात्मक उपाय

**वाढते** प्रदूषण हा जगभरातील मोठा धोका आहे. प्रदूषणामुळे लोक अनेक गंभीर आजारांना बळी पडत आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार, दमा, धाप लागणे, डोळे जळणे, घशातील संसर्ग, क्षयरोग असे गंभीर आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेऊन जागतिक स्तरावर अनेक संस्था त्यावर उपाययोजना करत आहेत. पण एवढेच नाही तर प्रदूषणामुळे तुम्हाला शरीराशी संबंधित गंभीर आजार तर होतातच पण त्यामुळे तुमच्या मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होत आहेत. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगभरातील प्रदूषणामुळे १८ ते २५ वयोगटातील तरुणांना अनेक मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि अनेक गंभीर आजारांशिवाय प्रदूषणाचा लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे तरुणांना पर्यावरण चिंतेची समस्या भेडसावत आहे. प्रतिध्वनी चिंताची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया.

**इको चिंता म्हणजे काय?**

वाढत्या प्रदूषणामुळे शरीराला गंभीर आजार तर होत आहेतच, पण त्याचबरोबर ते मानसिक समस्यांनाही कारणीभूत ठरत आहे. वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषणाची वाढती पातळी यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (एपीए) च्या मते, पर्यावरण-चिंता ही अशी स्थिती आहे जी वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामानातील बदलांमुळे लोकांमध्ये चिंतेचे कारण बनते. त्यामुळे लोकांमध्ये अनिश्चित भीतीचे वातावरण निर्माण होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. चिंतेमुळे लोकांच्या कामावरही परिणाम होत असून त्यामुळे शारीरिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही काळापूर्वी मानसशास्त्रज्ञांनी इको अॅन्झायटी दिली आहे आणि जगभर त्याविषयी बरीच चर्चा होत आहे. इको चिंतामुळे तुम्हाला आघात, तणाव, चिंता, नैराश्य आणि भीतीची भावना मुख्यतः १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये येत आहे.

**इको एंग्जायटीची कारणे**

पर्यावरणाच्या समस्या, वाढत्या प्रदूषणामुळे शरीरावर आणि आरोग्यावर होणारे परिणाम या चिंतेमुळे लोक पर्यावरणाच्या चिंतेचे बळी ठरत आहेत. यापैकी सर्वात जास्त प्रभावित लोक १८ ते २५ वयोगटातील तरुण आहेत. याशिवाय, ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पर्यावरणातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय संकटे, भविष्यात नोकऱ्या आणि इतर संकटांमुळे लोकांमध्ये पर्यावरणाची चिंता वेगाने पसरते यामुळे लोकांच्या काळजीचे एक कारण म्हणजे ते थांबवण्यासाठी काही करत नाहीत असा लोकांचा समज आहे.

**पर्यावरण चिंता लक्षणे**


वाढत्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाशी संबंधित बदलांमुळे मानवावर अनेक परिणाम होत आहेत. याचा एक मोठा परिणाम म्हणजे यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाच्या चिंतेची समस्या निर्माण होत आहे. इको चिंतेमुळे लोकांमध्ये दिसणारी लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

**जास्त काळजी**

■ भीती आणि अनिश्चित भीतीची भावना ■ कनिष्ठतेची भावना ■ झोप समस्या ■ भूक मध्ये बदल ■ लक्ष केंद्रित करू शकत नाही

**इको एंग्जायटीपासून वाचण्याचे उपाय**

इको चिंता टाळण्यासाठी, आपण प्रथम आपला आहार आणि आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. याशिवाय, जर तुम्ही तुमच्या दिनचर्येतून थोडा वेळ काढू शकत असाल, तर तुम्ही पर्यावरणाशी संबंधित काही कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. याशिवाय तणाव किंवा चिंता यासारख्या मानसिक समस्या टाळण्यासाठी या गोष्टी लक्षात ठेवा.



■ मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहावे.
■ कॉफी आणि कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा.
■ उद्या किंवा भविष्याबद्दल जास्त काळजी करू नका.
■ नकारात्मक परिस्थिती आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहा.
■ सकस आणि संतुलित आहार घ्या.
■ नियमित व्यायाम करा.

## इंटरनेटविना होईल ऑनलाइन पेमेंट! जाणून घ्या कशाप्रकारे वापरता येईल गुगल वॉलेट

**भारतात 5जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी काही ठिकाणी कमी आहे. त्यापासून वाचण्यासाठी गुगलने वॉलेटमध्ये व्हर्च्युअल कार्ड जोडून एक नवीन पेमेंट सिस्टम सुरू केली आहे. या पेमेंट सिस्टममध्ये गुगल वॉलेटवरून इंटरनेटविना देखील पेमेंट करता येईल.**

**भारतात** सध्या ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी सादर करण्यात आली आहे, परंतु तरीही काही ठिकाणी आजही इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नाही. त्यामुळे गुगलची एक नवीन टेक्नॉलॉजी खूप उपयुक्त ठरू शकते. ज्यात इंटरनेटविना ऑनलाइन पेमेंट करता येईल. गुगलनं कॉण्टॅक्टलेस पेमेंट सिस्टम सादर केली आहे. यात गगुल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या टेक्नॉलॉजीमध्ये गुगलला एकदा इंटरनेट कनेक्शन असताना कार्ड कनेक्ट करावा लागेल. त्यानंतर इंटरनेटविना पेमेंट करता येईल. कार्ड कनेक्ट झाल्यावर तुम्ही सिम्पल टॅप करून पेमेंट करू शकता.

**कशी वापरायची नवीन पेमेंट सिस्टम**

कॉण्टॅक्टलेस पेमेंटमध्ये कार्ड आणि कार्डविना फोन किंवा स्मार्टवॉचने पेमेंट करता येईल. जेव्हा तुम्ही गुगल वॉलेट ओपन करता तेव्हा एक डिफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसते. त्या पॉइंटवर फोन कार्ड डेटा रीडरपर्यंत पोहोचतो. जेव्हा तुमचा अँड्रॉइड फोन एनएफसी सिग्नल रीडरकडे पोहोचतो तेव्हा पेमेंट होतं.

तसेच जेव्हा तुम्ही ऑफलाइन असता तेव्हा तुमचा फोन कोणत्याही समस्येविना गुगल वॉलेटच्या एनएफसी-संचारित कोडचा वापर करून पेमेंट करतो. परंतु जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन राहिलात तर पेमेंट नीट होत नाहीत.

**नोट :** ऑफलाइन पेमेंटसाठी गुगलला दर दोन दिवसांनी कमीत



कमी एकदा इंटरनेटशी कनेक्ट व्हावं लागेल. ज्यामुळे तुम्ही बिनदिक्कत गुगल वॉलेटवरून ऑफलाइन पेमेंट करू शकाल.

**यूपीआय लाइटदेखील येईल वापरता**

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात यूपीआय लाइट लाँच केले. यूपीआय लाईट हे नियमित यूपीआयपेक्षा थोडे वेगळे आहे. हे एक 'ऑन-डिव्हाइस वॉलेट' वैशिष्ट्य आहे, जे वापरकर्त्यांना यूपीआय पिन न वापरता रिअल टाइममध्ये लहान रक्कम पेमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. यूपीआय लाइट लहान रकमेच्या व्यवहारांसाठी तयार केले आहे. त्यामुळे याद्वारे व्यवहाराची सर्वाधिक मर्यादा ५०० रुपये आहे. एनपीसीआय वेबसाइटनुसार यूपीआय लाइटद्वारे ५०० रुपयांपेक्षा कमी पेमेंटसाठी वापरकर्त्यांना यूपीआय पिनची गरज पडणार नाही. याशिवाय एनपीसीआयने म्हटले की, सुरुवातीला यूपीआय लाइट ऑफलाइन काम करेल.

## रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे



**सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.**

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन 'के'मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन 'सी' आणि 'ए' असते. व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.



## तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून?

**तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.**

**केस** मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

**केस स्ट्रेट असतील तर...**

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.



**केस ओले असतील तर...**

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

**कुरळ्या केसांसाठी**

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

## घरगुती क्रीम-साय

**सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.**



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेहऱ्यावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोर्पयावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकूत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

## क्रॅटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



**काही** वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे. काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. बुप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. 'जर्नल फार्माकोथेरपी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

## आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

**आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.**



**आंब्याच्या पानांच्याचहाची रेसिपी :** हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

**पोट ठेवेल निरोगी :** पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

**व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल :** व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

**अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

**ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर :** उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

**मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर :** आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह अँजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

## पहिल्याच पावसात कर्जतच्या किरवली ग्रामस्थांच्या घरात चिखलाचा थर

# टेकडीवरील खोदकामाचा फटका



**■पनवेल** : मान्सूनने रविवारी महाराष्ट्रात प्रवेश केला आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे सोमवारी कर्जत तालुक्यातील किरवली ग्रामस्थांची घरे चिखलमय झाली. पावसामुळे टेकडीवर माती थेट गावात आली आणि ग्रामस्थांच्या घर तसेच परिसरात चिखलाचे साम्राज्य पसरले. विशेष म्हणजे किरवली गावाच्या मागील टेकडीवर खोदकाम सुरू आहे. त्या खोदकामाबद्दल स्थानिकांनी महसूल विभागाला निवेदन देत याबद्दल चिंता व्यक्त केली होती. मात्र, नेहमीप्रमाणे त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अखेर सोमवारी कोसळलेल्या धो धो पावसात किरवली गावातील अनेकांच्या घरात घरामध्ये पाणी आणि माती शिरून चिखल झाला. त्यानंतर नुकसानीची माहिती घेण्यासाठी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी आणि तलाठी पोहचले. किरवली गावाच्या हद्दीत अनेक महिन्यांपासून पोकलन मशीनने टेकडी खोदण्याचे काम चालू आहे. हे खोदकाम तात्काळ बंद करावे, या मागणासाठी ग्रामस्थांनी महसूल विभागाला निवेदन दिले होते. गंभीर बाब म्हणजे २००५ मध्ये या भागात दरड कोसळून अनेक घरांचे घरांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यानंतर या भागात कोणतेही खोदकाम करण्याची परवानदी देऊ नका, या मागणीचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले होते. प्रत्यक्षात या तक्रारीची कुणीही दखल घेतली नाही. एका बिल्डरने बांधकामासाठी डोंगर फोडून तयार केलेला मातीचा भराव वाहून खाली आला आहे. ही माहिती मिळताच तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्या सूचनेनंतर मंडळ अधिकारी वैशाली पाटील, तलाठी वैशाली मांटे, तलाठी आकाश काळे तसेच कोतवाल सुनील गायकवाड यांनी किरवली गावाची

### कर्जत कल्याण रस्ता जलमय, नेरळ धरण ओव्हरफ्लो

पनवेल : मान्सूनच्या आगमनाची वर्दी आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पावसाने दाणादाण उडवली आहे. कर्जत तालुक्यात धुवांदार पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले आहे. कर्जत-कल्याण राज्यमार्ग अनेक ठिकाणी जलमय झाला. शिवाय इंग्रजांच्या काळातील नेरळमधील धरण दुधडी भरून वाहू लागल्याने नेरळ ग्रामस्थांना घरात पाण्याचा सामना करावा लागला. घरात पाणी शिरल्याने अनेक स्थानिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे कर्जत तालुक्यातील नद्या भरून वाहात आहेत. कर्जत-कल्याण रस्त्यावर साठलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांची कसरत सुरू होती. माणगाव ग्रामपंचायत हद्दीतील पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या गोट फार्महाऊसमध्ये जमीन सपाट करण्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव केल्याने नाल्याने वाहणारे पाणी थेट रस्त्यानवरून वाहत होते. त्यामुळे अंदाज



१०० मीटरचा रस्ता पाण्याखाली गेला होता. याच मार्गावरमिनी प्लाझा बांधताना नैसर्गिक नाला बंद केला होता. त्यामुळे येथील शार्विल शाळेच्या आवारात पाणी साठले होते. दामत गावाच्या हद्दीत कल्याणच्या बाजूला जाणारा रस्ता पाण्याखाली गेल्यामुळे एकेरी मागार्ने वाहतूक सुरू होती.

नेरळ धरण फुल्ल

नेरळ ग्रामपंचायतीतील धरण मुसळधार पावसामुळे सकाळीच ओव्हरफ्लो झाले. नेरळ पूर्व भागातील पाड्यामधील चंचे चाळीमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने पाच घरांमधील वस्तूंचे मोठे नुकसान झाले. चाळीचे मालक सूर्यकांत चंचे यांनी रेल्वे प्रशासनाच्या चुकीच्या कामामुळे घरांमध्ये पाणी शिरल्याचा आरोप केला आहे.

नेरळ ग्रामपंचायतचे प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी या भागाची पाहणी करून पाण्याला मार्ग काढण्यासाठी कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. त्याचवेळी रेल्वेला पत्र देणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, शेलू गावातील बांधीवली रस्त्यालगतची झाडे रस्त्यावर झाडे कोसळली होती. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला होता. शिवाय विजेचा खांब अर्धवट झुकल्याने भीतीचे वातावरण होते.

# रायगडवर वरुणराजा कोपला

## कर्जतमध्ये एकाचा मृत्यू, उरणमध्ये दोघे जखमी



**■ अलिबाग** : ऐन उन्हाळ्यात रायगडसह कोकणपट्टीवर आषाढासारखा पाऊस कोसळत आहे. रविवारी (२५ मे) दुपारपासून सुरू झालेल्या पावसाने रात्री चांगलाच जोर पकडला. विजांच्या कडकडाटासह तर काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस कोसळत असल्याने २६ मे २०२५ या दिवशी सर्वांना २६ जुलै २००५ ची आठवण होत आहे. रायगड जिल्ह्यात सरासरी १४०.५६ मि.मी. पाऊस सोमवार सकाळी ८ वाजेपर्यंत कोसळला आहे.

रायगडसह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. कोरड्याठाक झालेल्या नद्या काही वाहू लागल्या आहे तर ग्रामीण भागातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत. या व्यक्तीचा दापोली प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे. कर्जतच्या नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिरदोले गावातील तरुणावर वीज कोसळून जागीच मृत्यू झाला आहे. रोशन कचरू कालेकर (२५) असे त्याचे नाव आहे. शेतावर काम करत असताना ही दुर्घटना घडला. शिवाय उरण तालुक्यातील काळंबसुरे येथे दोन जण जखमी झाले असल्याची माहिती उरण तहसीलदार डॉ उद्धव कदम यांनी दिली आहे. पहिल्याच पावसात रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली वणंद येथील राजेंद्र कोळंबे (४५) नदी ओलांडताना सोमवारी सकाळी सायकलसह वाहून जाण्याची घटना घडली आहे. दापोली पोलीस प्रशासन, महसूल विभाग, ग्रामस्थ नदीपात्रात त्याचा शोध घेत आहेत.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, मुरुड भागात पावसाचा मोठा जोर आहे. महाड येथून रायगड किल्ल्याकडे जाणारा रस्ता खचला आहे. रायगड जिल्ह्यात सोमवार (२६ मे) सकाळी ८ वाजेपर्यंत २२४९ मि.मी. पाऊस कोसळला आहे. सर्वाधिक पाऊस मुरुड तालुक्यात (३७१ मिमी) झाला असून त्या खालोखाल श्रीवर्धन तालुक्यात ३०७ मिमी पाऊस कोसळला आहे.

### तिन्ही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

रायगडसह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून अगदी महत्त्वाच्या कामाशिवाय लोकांनी बाहेर पडू नये, असा सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. दापोली-खेड प्रमुख राज्य मागार्चे गेले काही महिने काम सुरू आहे. याच मार्गावर खेड तालुक्यातील फुरुस गावाजवळ पुलाचे काम सुरु असून, त्यासाठी पयार्यी मार्ग करण्यात आला होता. मात्र, या रस्त्यावर पावसामुळे चिखल झाल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. दापोली- खेड मार्गावरील वाहतूक आता दस्तुरीवरून पालगडमार्गे वळवण्यात आली आहे.

## आता हुंडामुक्तीसाठी महाराष्ट्रात लढा!

# राष्ट्रवादी शरद पवार गटाची २२ जूनपासून मोहीम

**■मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने २२ जूनपासून राज्यात हुंडाबळी व हिंसामुक्त महाराष्ट्रासाठी लढा उभारण्याचा निर्धार केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, वैष्णवी कस्पटे- हगवणे हिचा वेदनादायक पद्धतीने हुंडाबळी झाला. ज्या राज्याने स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने देशाला दिशा दाखविण्याचे काम केले तेथे वैष्णवीसारख्या लेकीचा बळी जाणे हे संतापजनक आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र सुन्न झाला असून यासाठी केवळ संताप आणि दुःख व्यक्त करून भागणार नाही तर जोरदारपणे कृतिशील जागृतीचे पाऊल उचलावे



लागेल. समाजातील सर्व घटकांचा, सर्व यंत्रणांनी यात सहभाग घ्यावा आणि मोहिमेतूनच ह्यहुंडामुक्त महाराष्ट्र आणि हिंसामुक्त कुटुंबाचेह्व उद्दिष्ट सध्या करता येईल आणि वैष्णवीला तीच श्रद्धांजली ठरेल, अशी पोस्ट सुप्रिया सुळे यांनी केली आहे. सुळे म्हणाल्या की, शरद पवार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्याने तीन दशकांपूर्वी देशातील पहिले महिला धोरण २२ जून १९९४ रोजी जाहीर केले. ते धोरण तयार करण्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व घटकांनी आणि यंत्रणांनी आपले योगदान दिले होते. त्यामुळे अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक बदल राज्यातील महिलांच्या जीवनात घडले.

"गेली ५० वर्षे राज्यामध्ये विविध संस्था, संघटना आणि व्यक्ती स्त्री पुरुष समतेची चळवळ कष्टाने आणि नेटाने पुढे नेत आहेत. हे सर्व पूर्वसंचित सोबत घेऊन येत्या २२ जूनपासून पुण्यातून मोहिमेची सुरुवात होणार आहे. वर्षभर वेगवेगळ्या टप्प्यात ही मोहीम राज्याच्या सर्व भागात राबविण्यात येणार असून मोहिमेचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत याचा पाठपुरावा करणार आहोत."

**- सुप्रिया सुळे, खासदार**

## 'राष्ट्रवादी पुन्हा' गाण्यावर चक्क महिलेच्या अंगात आलं

# पंढरपूरच्या मेळाव्यात नेमकं काय घडलं?

**■ठाणे** : पंढरपुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्यात एक विचित्र प्रकार पाहायला मिळाला. या मेळाव्यात करमणुकीसाठी गाणे सुरू असताना चक्क महिलेच्या अंगात आल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे या महिलेच्या जेव्हा अंगात आलं तेव्हा या मेळाव्यात पक्षाचं राष्ट्रवादी पुन्हा हे गाणं सुरू होतं. घडलेल्या या प्रकारची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

पंढरपूरमध्ये राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्याला खासदार सुनेत्रा पवार येणार होत्या, मात्र त्यांना



### व्हिडीओची जोरदार चर्चा

हा व्हिडीओ समोर आल्यानंतर आता या व्हिडीओची जोरदार चर्चा सुरु झाली आहे, ज्यामध्ये गाणं सुरु असताना काही महिलांच्या अंगात आल्याचं दिसून येत आहे, त्यानंतर या महिलांच्या कपाळावर हात ठेवून त्यांना शातं देखील केल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान हा व्हिडीओ आता समोर आल्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्यात अंधश्रद्धेला खत पाणी घातल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे.

मेळाव्याच्या ठिकाणी येण्यास उशिरा झाला, तोपर्यंत महिलांच्या मनोरंजनासाठी गाणी लावण्यात आली होती, या गाण्यांवर नाचत असताना अचानक महिलेच्या अंगात आल्याचा प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे जेव्हा या महिलेच्या अंगात आलं तेव्हा तिथे पक्षाचं राष्ट्रवादी पुन्हा हे गाणं सुरू होतं. अंगात आल्यानंतर काही महिलांनी या महिलेच्या कपाळाला हात लावून तिला शांत केल्याचं देखील पाहायला मिळालं. दरम्यान हा व्हिडीओ आता समोर आल्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्यात अंधश्रद्धेला खत पाणी घातल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे.

**व्हिडीओमध्ये नेमकं काय?**

पंढरपुरात राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं, या मेळाव्याला खासदार सुनेत्रा पवार उपस्थित राहणार होत्या, मात्र त्यांना मेळाव्यात येण्यासाठी उशिर झाला, त्यामुळे महिलांच्या करमणुकीसाठी काही गाणे लावण्यात आले. गाणे सुरु असतानाच तेथील काही महिलांच्या अंगात आल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे इथे एका महिलेच्या जेव्हा अंगात आलं तेव्हा त्या मेळाव्यात पक्षाचं राष्ट्रवादी पुन्हा हे गाणं सुरू होतं. या महिलेच्या कपाळावर हात ठेवून तिला शांत करण्यात आल्याचं देखील दिसून येत आहे. पंढरपुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, राष्ट्रवादीच्या महिला मेळाव्यात एक विचित्र प्रकार पाहायला मिळाला. या मेळाव्यात करमणुकीसाठी गाणे सुरू असताना चक्क महिलेच्या अंगात आल्याची घटना घडली आहे.

# शिंदे सेनेच्या कंटेनर शाखांवर कारवाई

## उपमुख्यमंत्र्यांच्या स्थगितीनंतरही ९ कंटेनर हलविले

**■भाईंदर** : मीरा-भाईंदरमधील शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हाप्रमुखांच्या निवेदनानुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कंटेनर शाखांवर कारवाईस स्थगिती दिली असताना दुसरीकडे महापालिकेने मात्र भाजप व अन्य पक्षांच्या मागणीनंतर रस्ते-पदपथावरील ९ कंटेनर शाखा हटवल्या. पालिकेच्या कारवाईसोबतच शिंदे गटाने देखील स्वतःहून ७ कंटेनर शाखा काढून घेतल्या आहे.

शिंदे गटाच्या कंटेनर शाखांविरोधात भाजप आमदार नरेंद्र मेहतांनी आक्रमक भूमिका घेत पालिका आयुक्तांच्या निवासस्थानाबाहेर भाजपचे कंटेनर कार्यालय थाटले. पोलीस आयुक्तालय, पोलीस ठाणेसह अनेक शासकीय कार्यालयांबाहेर कंटेनरच्या माध्यमातून कार्यालये



### उपमुख्यमंत्र्यांची स्थगिती

पालिकेच्या नोटीसची मुदत संपण्याआधी भाजपने आयुक्त बंगल्याबाहेरील कंटेनर कार्यालय काढून घेतले, तर शिंदेसनेने कंटेनर शाखा काढून घेण्यासाठी १५ दिवसांची मुदत मागितली होती. दुसरीकडे जिल्हाप्रमुख राजू भोईर यांच्या निवेदनावर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी कंटेनर शाखा काढण्यास स्थगितीचे आदेश प्रधान सचिवांना देत त्याचा अहवाल सादर करण्यास सांगितले.

थाटण्याचा इशारा मेहतांनी दिला. मेहतांच्या आक्रमक पावित्र्यानंतर आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या आदेशानुसार रस्ते-पदपथवरील कंटेनर कार्यालयांप्रकरणी राजकीय पक्षांना नोटीस देण्यात आल्या.

शिंदे गटाने देखील आक्रमक होत थेट आ. मेहतां विरुद्ध लेखी तक्रार उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली. शिवसेनेच्या विकासकामांमुळे धाबे दणाणलेल्या आ. मेहतांनी शाखांवर कारवाईची मागणी करत आयुक्तांवर दबाव टाकला आहे. मात्र आ. मेहतांच्या अनेक बेकायदेशीर कृत्यांची पोलखोल होणे गरजेचे असून अनेक सुविधा व आरक्षित भूखंड तसेच जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याचे भासवून मेहतांच्या सेव्हन इलेव्हन कंपनीने टिडीआर लाटलेला आहे.

मीरा - भाईंदरमध्ये अनधिकृतरीत्या खाऊगल्या वसविण्यात आल्या. फुटपाथवर व रस्त्यावर अनधिकृत फेरीवाले बसवून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात वसुली सुरू आहे. पालिकेच्या मोकळ्या भूखंडावर स्वतःची कार्यालये उभारण्यात आली आहेत. पालिकेच्या अनेक प्रकल्पात मधुसुदन पुरोहितसारख्या चेल्यांना बेकायदेशीररीत्या कामे दण्यात आल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे १० वर्षाच्या ग्रंथ मुथा या बालकाला आपला जीव गमवावा लागला असल्याचे आरोप जिल्हाप्रमुख राजू भोईर यांनी तक्रारीत केले. मात्र महापालिकेने शिंदे गटाच्या कंटेनर शाखांवर कारवाई सुरू करत रस्ते- पदपथवरील आतापर्यंत ९ कंटेनर शाखा उचलल्या आहेत.

पालिकेच्या कारवाईने शिंदे गटाने देखील ७ शाखा स्वतःहून काढून घेतल्या आहेत. महापालिकेच्या कारवाईचे भाजपसह अनेक राजकीय पक्षांच्या पदाधिकारी यांनी स्वागत केले आहे.

# पुण्यातील महिला डॉक्टरचा अनोखा उपक्रम




**■पुणे** : दृष्टीहीन व्यक्तींना स्पर्श ज्ञान अफाट असतं असं म्हणतात. आणि याच स्पर्शज्ञानाच्या जोरावर दृष्टीहीन महिला अनेक महिलांचे प्राण वाचवतायेत. पण पुण्यातील एक महिला डॉक्टर ब्रेस्ट म्हणजे स्तनाच्या कॅन्सरचे निदान करण्यासाठी दृष्टीहीन मुलींना प्रशिक्षित करतायेत. डॉक्टर आरती शिराळी यांच्या अभिनव उपक्रमाबाबत जाणून घेऊयात.

डॉक्टर आरती शिराळी या स्वतः ब्रेस्ट कॅन्सर सर्जन आहेत. अबूधाबीच्या एका मोठ्या रूग्णालयात महिन्याला लाखो रूपयांच्या कमाईवर पाणी सोडून त्या सध्या दृष्टीहीन मुलींना सोबत घेवून राज्यात ठिकठिकाणी निशुल्क कॅम्प भरवतात. महिलांमध्ये ब्रेस्ट म्हणजे स्तनाच्या कॅन्सरचे वेळेत निदान आणि उपचार होत नसल्याने मृत्यूंचे प्रमाणही वाढतंय. हीच उणीव लक्षात घेवून त्यांनी पुण्यात ट्रस्ट इन पिंक फाऊंडेशनच्या माध्यमातून स्पर्श वरदान नावाचा कार्यक्रम हाती घेतलाय. परंतु स्तनाच्या कॅन्सरचे निदान करण्यासाठी अस्तित्वातील पर्याय खूपच महागडा होता. म्हणून त्यांनी संशोधनाअंती दृष्टीहीन मुलींच्या स्पर्शज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे ठरवले आणि त्यांना स्तनाच्या कॅन्सरची गाठ ओळण्यासाठी शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले. आता या दृष्टीहीन मुली यात पारंगत झाल्या आहेत. अगदी छोटीशी गाठही त्या आता ओळखतात.

देशात कॅन्सर झालेल्या ४ महिलांपैकी एक महिला ही स्तनाचा कॅन्सर झालेली असते. त्यात बदलत्या जीवनशैलीमुळं तरूणींमध्ये हे प्रमाण वाढताना दिसतंय. म्हणून या संस्थेद्वारे शाळा,कॉलेजमध्ये अधिकतर निशुल्क कॅम्प भरवून तपासणी आणि याविषयी जागरूकता केली जातंय. आतापर्यंत या दृष्टीहीन मुलींनी 10 हजार महिला,मुली यांची तपासणी केली असून 100 महिलांना स्तनाच्या कॅन्सर असल्याचे निदान केलंय. सरकारने या स्पर्श वरदान कार्यक्रमाला मदत केल्यास दृष्टीहीन मुलींना रोजगार तर उपलब्ध होईलच शिवाय सर्व महिलांची तपासणीही शक्य होईल.

# आधी अपहरण नंतर अत्याचार गर्भपात करून वेश्या व्यवसाय करायला भाग पाडलं

डोंबिवलीमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, या घटनेनं खळबळ उडाली आहे. एका 15 वर्षीय मुलीचं अपहरण करून तिला खोलीत कोंडून ठेवण्यात आलं, तिच्यावर अत्याचार करण्यात आला, त्यानंतर तिचा गर्भपात करून तिला वेश्या व्यवसायात ढकलण्यात आलं, पोलिसांनी दोन महिन्यांनंतर या मुलीची सुटका केली आहे, या प्रकरणात टिळक नगर पोलिसांनी एका महिलेसह चौघांना बेड्या ठोकल्या आहेत, तर या मुलीचं अपहरण करणारा आरोपी अजूनही फरार आहे, त्याचा शोध सुरू आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, डोंबिवलीत उघडकीस आलेल्या एका घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे . मसाला विक्री करणा[illegible]या एका व्यक्तीनं एका पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केले, तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. गर्भवती राहिलेल्या पीडितेचा एका महिलेच्या घरी नेऊन गर्भपात केला. त्यानंतर या पीडित मुलीला एका दाम्पत्याच्या घरी ठेवले. या दाम्पत्याने तिला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. तीच्यावर पुन्हा लैंगिक अत्याचार सुरू होता. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने हा सगळा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अखेर टिळक नगर पोलिसांनी या महिलेच्या घरी छापा टाकत मुलीची सुटका केली. पोलिसांनी या प्रकरणात एका महिलेसह तिचा पती , दोन पुरुष अशा चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत. धक्कादायक म्हणजे यामधील अटक झालेली मुस्कान शेख या महिलेविरोधात



याआधी देखील पीटा अंतर्गत गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे .

सदर पीडित मुलगी आपल्या आई व बहिणींसह डोंबिवली जवळील ग्रामीण परिसरात राहते. तिच्या आईचा खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय आहे. याच व्यवसायातून आशुतोष राजपूत या तरुणाचे त्यांच्या घरी येणे जाणे होते. तो देखील मसाले विक्रीचा व्यवसाय करत होता. याच ओळखीचा फायदा घेत आशुतोषने पीडित अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवली. अल्पवयीन मुलीने दहावीची परीक्षा दिल्यानंतर तिचे आणि तिच्या आईचे भांडण झाले . त्यामुळे रागावलेल्या पीडितेने आशुतोषशी संपर्क साधला व त्याच्या घरी गेली. या संधीचा आशुतोषने फायदा घेतला. तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलगी घरी परतली नाही म्हणून आईने शोधा शोध करण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान आशुतोष हा तिच्या आईला भेटत होता व तो मुलीला मी तुमच्या मुलीला आज या ठिकाणी बघितले त्या ठिकाणी बघितले असे सांगून मुलगी शहरातच आहे असे सांगत होता. मुलगी रागवलेली असल्याने ती परत येईल या आशेने पीडितेची आई आशुतोष वर विश्वास ठेवत होती .

मात्र दोन महिन्यांपासून मुलगी घरीच न आल्याने तिला संशय आला. तिने याप्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी मुलीचा शोध सुरू केला. याचदरम्यान ही मुलगी डोंबिवली जवळील ग्रामीण भागात एका घरात असल्याची माहिती मिळाली, पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकत या पीडित मुलीची सुटका केली . पीडित मुलीने केलेल्या खुलाशानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. मुस्कान शेख तिचा नवरा यांच्यासह दोन जणांना अटक केली . चौकशी दरम्यान धक्कादायक माहिती समोर आली. आशुतोष राजपूत यानेच मुलीचं अपहरण करत तिला एका खोलीत डांबून ठेवले होते. तीच्यावर अत्याचार केल्याचं समोर आलं आहे.

## जेवणासाठी बनवलेले मासे कुत्र्याने खाल्ले

# मुलानं जन्मदात्या आईलाच संपवल

**■धुळे** : धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील थाळनेर पोलीस स्टेशन हद्दीत एक धक्कादायक घटना घडली आहे. जेवणासाठी बनवलेले मासे कुत्र्याने खाल्ल्याच्या रागातून मुलाने आईच्या डोक्यात लाकडी दांडका मारल्याने आईचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. टिपाबाई रेबला पावरा असं मृत्यू झालेल्या आईटं नाव आहे. तर आवलेस रेबला पावरा असे आरोपी मुलाचं नाव आहे.



### काही तासातच आरोपीला केलं अटक

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील वाठोडे गावातील देवेंद्र बिलेसिंग राजपूत यांच्या ताजपुरी शिवारातील शेतात काम करणाऱ्या टिपाबाई रेबला पावरा या महिलेने जेवणासाठी मासे बनवले होते. जेवणासाठी बनवलेले मासे कुत्र्याने खाल्ल्याच्या रागातून टिपाबाई रेबला पावरा यांचा मुलगा आवलेस रेबला पावरा याने आईच्या डोक्यात लाकडी दांडक्याने मारहाण केली. यामध्ये टिपाबाई पावरा यांचा मृत्यू झाला आहगे. यानंतर अवघ्या काही तासातच पोलिसांनी आरोपी आवलेस पावरा याला ताब्यात घेतले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com